# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. 0217-2744770, 2744766, 2474767, 2744771

संकेतस्थळ www.sus.ac.in ई मेल : coordinator.avishkar@sus.ac.in, director.iil@sus.ac.in

**नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ आविष्कार विभाग**





पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

॥ विद्यया संपन्नता ॥

NAAC Accredited-२०२२

B ++ (CGPA२.९६)


**जा.क्र.पुअहोसोविसो/आविष्कार/२०२३/** १०९ दिनांक : 7 NOV 2023

**प्रति,**

**मा.संचालक/प्राचार्या/प्राचार्य**

पु.अ.हो.सोविसो/संलग्नित,

सर्व महाविद्यालय/संस्था/संकुले

**विषय :- महाविद्यालय/संकुलस्तरावर आविष्कार समन्वयकाची नेमणूक करुन महाविद्यालयस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव-२०२३ चे आयोजन करणेबाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांच्या संशोधन वृतीला चालना देण्यासाठी व त्यांचे संशोधन समाजापुढे आणण्याकरिता दरवर्षी विद्यापीठस्तरीय, आंतरविद्यापीठीय, राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये सुसुत्रता आणण्याकरिता आणि संकुल/महाविद्यालय व विद्यापीठ यांच्यामध्ये प्रभावी संप्रेषणाकरिता संकुल/महाविद्यालयस्तरावर आविष्कार समन्वयकाची आवश्यकता आहे. आपल्या संकुल/महाविद्यालयामधील अनुभवी व संशोधन वृत्तीच्या प्राध्यापकांची आविष्कार समन्वयक म्हणून नियुक्ती करुन त्यांच्या नावाच्या नोंदणीसाठी मा.संचालक/प्राचार्य यांच्या ई-मेलवरती एक लिंक देण्यात येईल त्या लिंकवरील Google Form द्वारे दि. १० नोव्हेंबर, २०२३ पर्यंत प्राध्यान्यक्रमाने आविष्कार समन्वयकाचे नाव नोंदणी करावी.

संकुल/महाविद्यालयस्तरावर दिनांक **१७ नोव्हेंबर, ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०२३** पर्यंत आविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करावे यासाठी जास्तीत जास्त संशोधन विद्यार्थ्यांना यामध्ये सहभागी होण्यास प्रवृत करावे. याकरिता शक्यतो इतर संकुल/महाविद्यालयातील परीक्षक नेमून संबंधित संशोधन/ प्रकल्पाचे परीक्षण करावे व त्यातून अंतिम निवड झालेल्या संशोधक विद्यार्थ्यांच्या नोंदणीसाठी मा.संचालक/प्राचार्य व संकुल/महाविद्यालयाने नियुक्त केलेले आविष्कार समन्वयक यांच्या ई-मेलवरती एक लिंक देण्यात येईल त्या लिंकवरील Google Form द्वारे दिनांक **०५ डिसेंबर, २०२३** पर्यंत नोंदणी करावी. संकुल/महाविद्यालयस्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या Project Synopsis चे एक पान पाठविणे गरजेचे आहे.

मा. संचालक/प्राचार्य व आविष्कार समन्वयक यांच्या ई-मेलवरती आविष्कार संशोधन महोत्सवाची सर्वसाधरण मार्गदर्शक तत्वे pdf स्वरुपात पाठविण्यात येतील तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आविष्कार या मथळयाखाली प्रसिध्द करण्यात येतील. एका संशोधन प्रकल्पासाठी एकाच स्पर्धक विद्यार्थ्याची निवड करावी. याबाबत काही अडचणी असल्यास coordinator.avishkar@sus.ac.in या ई-मेलवरती किंवा आविष्कार समन्वयक/सहसमन्वयक यांच्याशी संपर्क साधावा.

वरीलप्रमाणे सर्व बाबीची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

आपली स्नेहांकित

**(डॉ.अंजना लावंड)**

प्र.संचालक, न.न.व साहचर्य मंडळ

१. समन्वयक :- डॉ.व्ही.पी.धुळप- ७५८८३८४५७६

२. सह समन्वयक : डॉ. ए.आर.शिंदे- ९७६४६१७३९३